# आरएसएस जनकल्याण समितीला रुग्णवाहिका भेट



**मुंबई (प्रतिनिधी) :**

भारतातील ग्रामीण भागातील आरोग्य सेवा वाढवण्याच्या सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून, क्लिक हिल फाउंडेशन या क्विक हिल टेक्नोलॉजीजच्या सीएसआर शाखेने, पनवेल येथील आरएसएस जनकल्याण समितीसाठी 'आरोग्य यान' उपक्रमाअंतर्गत ॲम्ब्युलन्स भेट दिली. क्विक हिल टेक्नोलॉजीजचे एमडी आणि सीईओ श्री कैलाश काटकर, क्विक हिलच्या सीएसआर ॲक्टिव्हिटी आणि आरोग्य याना मागील प्रणेत्या अनुपमा काटकर आणि विठ्ठल डाके (उपायुक्त पनवेल), धैर्यशील जाधव (सहआयुक्त पनवेल), आरएसएस जनकल्याण समिती, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. रवींद्र साताळकर आणि उपाध्यक्ष विनायक दंभीर यांच्या उपस्थितीत भेट देण्याचा कार्यक्रम झाला. आरएसएस जनकल्याण समिती या भागातील वंचित लोकांकरिता आरोग्य सेवा पुरवते तसेच नियमित आरोग्य तपासणीच्या योजना राबवते.